पुढारी | गुरुवार ३१ डिसेंबर २०१५

# दुर्बलांना मदतीची गरज : नसीमा हुरजूक

**दोडामार्ग : प्रतिनिधी**

समाज्यात अपंगा बरोबरच अनेक दुर्बल घटक अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत, या घटकांसाठी सर्वांनी मदतीचा हात पुढे केला पाहिजे. आपल्या बरोबरच्या दुर्बल घटकांना सोबत घेऊन गेले तरच आपला उत्कर्ष होईल. दुर्बलांसाठी काम करणाऱ्या अनेक सेवाभावी संस्थांना मदत करताना, ती घेण्यापेक्षा देण्याचा आनंद हा अवर्णनिय असतो, असे विचार आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या समाजसेविका व हेल्पर्स ऑफ दी हॅण्डीकॅण्ड कोल्हापूर या संस्थेच्या अध्यक्षा नसीमा हुरजूक यांनी मांडले.

दोडामार्ग लक्ष्मीबाई सीताराम हळदे महाविद्यालयात महिला विकास कक्षाच्यावतीने 'लेक लाडकी'या निमित्ताने अभियांनातर्गत विद्यार्थीनी व त्यांच्या आई अर्थात मायलेकींचा स्नेहसंमेलन मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या.




**दोडामार्ग : दोडामार्ग-महात्मा गांधी स्कूलमध्ये श्रीमती नसिमा हुरजूक यांचा सत्कार करताना डॉ.पाटील, सोबत विवेकानंद नाईक व अन्य**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.व्ही.ए.पाटील, संस्थासदस्य विवेकानंद नाईक, बाबुराव धुरी, सुमन कोरगांवकर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन मुलींनीच केले होते. सौ.माधुरी सावंत, सौ.वसुधंरा गवस,सौ.वैशाली गवस, स्वावलंबी अपंग कु.संगिता राऊळ सौ.सुजल गवस, सौ.माधवी मणेरीकर, कु.प्रज्ञा शिरोडकर, कु. ज्योती जाधव व महाविद्यालयाच्या वरिष्ठ लिपिक सौ.किरण नाईक या सर्वांच्या पुष्पगुच्छ भेटवस्तू देऊन हुरजूक यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला.

मार्गदर्शन करताना हुरजूक पुढे म्हणाले की अपंगांच्या डोळ्यातला अपंगत्वाचा ठसा मिठविण्यासाठी त्यांना स्वावलंबी बनविले पाहिजे. त्यासाठी त्यांचा स्वतंत्र शाळा हव्यात. कारण सर्वसाधारण मुलांच्या शाळेत त्यांना अनेक समस्यांना तोंड दयावे लागते, मी स्वत: ते अनुभवले आहे. कधी-कधी जेव्हा माणसाला

खरी गरज असते, तेव्हा कोणी ही मदत करत नाही. पण जेव्हा गरज नसते, तेव्हा हजारो हात पुढे येतात. तेव्हा योग्य वेळी त्यांना मदत केली पाहिजे. आपल्या संस्थेतील अनेक उपक्रमांची माहिती दिली, त्यांनी सांगितलेल्या अनेक आठवणींनी विद्यार्थ्यांना अश्रु आवरता आले नाही, त्यांनी वृध्दाश्रम काढण्याचे स्वप्न बोलून दाखविले. यावेळी त्यांच्या जीवन प्रवासावर व कार्यावर आधारित लघुपट दाखविण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकास डॉ.पाटील यांनी महाविद्यालयाने राबविलेल्या नवनवीम उपक्रमांची माहिती देवून महिला विकास कक्षाच्या खात्याने मागील पान २ वर»

दुर्बलांना मदतीची गरज : नसीमा हुरजूक

उद्दिष्ट कथन केली. हॅण्डीकॅण्ड या कोल्हापूर येथील संस्थेला विद्यार्थिनींनी जमा केलेल्या भाऊबीज निधीतून ५००० रू. चा धनादेश देण्यात आला. तसेच उद्योजिका सौ.सुजल सूर्यकांत गवस यांनी देखील २००० रू.ची आर्थिक मदत दिली. प्राचार्यांच्या हस्ते श्रीमती हुरजूक यांचा श्रीफळ व शाल देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विभागप्रमुख आर.एस.इंगळे, सौ.किरण नाईक, सर्व प्राध्यापक कार्यालयीन कर्मचारी विद्यार्थी-विद्यार्थीनीने अथक परिश्रम घेतले.सूत्रसंचालन सौ.